नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१३०.

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ बंडू कुंभरे याची उलट तपासणी आरोपी क्र.१, २, ४,५ व ७ ते ९, ११, १३ ते १५, १७ ते १९ व २१ ते २३ चे वकिल श्री ए.व्ही. गजभिये यांचेमार्फत शपथेवर सूरू</u>**

**२.** माझी सलामा गेट येथे २४ तास डयुटी असते. हे म्हणणे खरे आहे की मी सिल्लारी येथे राहतो. सिल्लारी ते सलामा गेट मधील अंतर अंदाजे १३ किमी आहे. ज्या दिवशी माझी सही घेतली त्या दिवशी मी पुर्ण २४ तास सलामा गेट येथे डयुटीला होतो. हे म्हणणे खरे आहे की, गेटची डयुटी संपल्याशिवाय जागा सोडतो येत नाही. निशानी क्र.१०८ वरील माझया बयाणावरील माझी सही सलामा आफीस येथे दुपारी ३-४ वाजता घेतली होती.

**३.** मी बयाण देतांना असे सांगीतले होते की, मी त्यावेळेस सलामा गेट येथे वनमजुर म्हणून कार्यरत होतो व त्या दिवशी मॅजीन नाला येथे काही लोक आढळले ते लोक तेथे बसलेले होते व तेथे एसटीपीएफ त्यांच्याजवळ गस्ती करत आले व त्यांचे बयाण घेतली व त्यांना अटक केली, तेथे अंदाजे २०-२५ लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाबी माझ्या बयाणात नमुद नाही. सदर बाबी माझ्या बयाणात कां नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात उपस्थीत आरोपींचे नाव व पत्ता माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी यांना ओळखत नाही.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटना साधारण २०१८ साली घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यावेळी मी सलामा गेट येथे वनमंजूर म्हणून कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, वायरलेश मॅसेज आला की, तेथे आरोपी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यामुळे क्षेत्रसहाय्यक यांनी तेथे जाण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यानंतर मी, सोबत दोन वनरक्षक व क्षेत्रसहाय्यक व ५-७ मजूर आम्ही निघालो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यानंतर मॅगझींन नाला क्र.२ तेथे आम्हाला लोक आढळले ते लोक तेथे बसलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, तेथे एस.टी.पी.एस. जवळ गस्ती करत आले. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यानंतर आरोपींना घेरावा घातला व त्यांना पकडून पिंपरिया कार्यालय येथे आणले.हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्यानंतर आरोपींचे बयान वैगेरे घेतले व त्यांना अटक केली. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, असे अंदाजे तेथे २०-२५ लोक होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, माझे बयान देखील घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे

मी खोटे सांगत आहे की, जे लोकांना माझ्या समोर पकडले होते त्यांना मी ओळखतो.

**०५.** एसटीपीएफ म्हणजे काय हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतली त्याप्रमाणे तथाकथीत घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वनविभागात कामास असल्याने वनअधिकारी यांनी बनविलेल्या माझया खोटया बयान नि.१०८ वर त्यांच्या सांगण्यानुसार सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, वनअधिकारी यांचे सांगण्यावरून आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी आरोपी क्र.३, ६, १०, १२, १६, २० व २४ करीता त्याचे वकिल श्री ए.जी.कारेमोरे यांचनी वरील उलटतपास सदर आरोपींकरीता गृहीत धरण्यात यावा अशी विनंती केली. सदर विनंती मंजूर करण्यात आली.**

उलटतपास संपला
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत,

रामटेक
दिनांक - ०२/०७/२०२४

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, रामटेक